**वाचा :-** १) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे कलम ६६ (१)

२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव यांचे कडिल पत्र क्रं.पंसमा/आरोग्य/आस्था-२/५७९/२०१७ दिनांक ०३/०७/२०१७

३) श्रीमती.मंगला त्र्यंबक पगारे, आरोग्य सेविका (म) यांचा स्वेच्छा सेवानिवृत्ती नोटीस दि.१९/६/२०१६

४) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक - 21 /12 /२०१७.

---

## आदेश

**नाशिक जिल्हा परिषद नाशिक**
**आरोग्य विभाग**
जा.क्र.आरोग्य/आस्था-५/1545/२०१७.
दिनांक - 29/12/२०१७.

श्रीमती. मंगला त्र्यंबक पगारे, आरोग्य सेविका (महिला), प्रा.आ.केंद्र. निमगांव, ता.मालेगांव यांनी दिनांक १९/०६/२०१६ रोजीच्या अर्जान्वये ९० दिवसाच्या विहीत मुदत्तीनंतर दिनांक १९/०९/२०१७ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्तीस परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे. श्रीमती. मंगला त्र्यंबक पगारे, हया दिनांक २६/०७/१९८६ रोजी आरोग्य सेविका (म) या पदावर हजर झालेले असुन. त्यांची दिनांक १९/०९/२०१७ अखेर एकूण सेवा-३१ वर्षे- ०१ महिने- २२ दिवस होणार आहे.

श्रीमती.मंगला त्र्यंबक पगारे, आरोग्य सेविका (महिला) यांचेविरुध्द खातेचौकशी सुरु नाही अथवा प्रस्तावित नाही. त्यांचेकडेस शासकिय / जिल्हा परिषदेचे इतर येणे नसल्याबाबतची गट विकास अधिकारी पंचायत समिती, मालेगांव यांची खात्री झाल्याने तसे दाखले पुरवुन त्यांनी स्वेच्छा सेवानिवृत्तीसाठी शिफारस केली आहे.

**महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्तीवेतन ) नियम १९८२ चे ६६ ( १ ) नुसार श्रीमती. मंगला त्र्यंबक पगारे, आरोग्य सेविका (महिला) यांना दिनांक १९/०९/२०१७ पासून स्वेच्छा सेवा निवृत्ती घेण्यांस परवानगी देण्यांत येत आहे.**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम- १९८२ प्रकरण-१ नियम ६ (२) अन्वये स्वेच्छा सेवानिवृत्ती होणाऱ्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत सेवानिवृत्ती शेवटची तारीख विनाकामाचा दिवस म्हणून मानण्यात येत असल्याने सदर दिवसाचे वेतन भरणा करण्यात यावे.

सदर आदेशाची नोंद श्रीमती.मंगला त्र्यंबक पगारे, आरोग्य सेविका (महिला) यांचे मुळसेवापुस्तकात घेण्यांत यावी.

29/12

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**सोबत - मुळसेवा पुस्तक.**

**प्रति:-१) श्रीमती. मंगला त्र्यंबक पगारे, आरोग्य सेविका (महिला), प्रा.आ.केंद्र. निमगांव, ता. मालेगांव.**
**प्रत:- १) म.गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव.**

२/- श्रीमती. मंगला त्र्यंबक पगारे, आरोग्य सेविका (महिला) यांचे मुळसेवा पुस्तक सोबत पाठविणेत येत आहे. तरी श्रीम.पगारे, आरोग्य सेविका (महिला) यांचे मुळसेवा पुस्तक मिळाले बाबत पोहोच या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रतीलिपी:- माहितीस्तव रवाना.**

**१) तालुका वैद्यकीय अधिकारी पंचायत समिती, मालेगांव.**
**२) वैदयकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र.निमगांव, ता.मालेगांव.**
**३) मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.**
**४) मध्यवर्ती माहिती तंत्र कक्ष (आयटी सेल) सामान्य प्रशासन विभाग, जि.प.नाशिक.**